# मग्रंसंठाणे वार्ता

वर्ष १ ले । अंक - ३ । ऑगस्ट २०२४ । पाने -८

संपादक - संजीव फडके, डॉ. निर्मोही फडके


## संपादकीय

**नमस्कार,**

'मग्रंसंठाणे' ह्या डिजिटल त्रैमासिकाचा हा तिसरा अंक वाचकांच्या डिजिटल स्क्रीनवर पाठवताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

जून, जुलै, ऑगस्ट ह्या तीन महिन्यांमध्ये पडणाऱ्या मुसळधार पावसात भिजणारे रसिक, वाचक हे नव्या-जुन्या पुस्तकांच्या वाचनातही आणि ग्रंथालयातील कार्यक्रमांतही तुडुंब न्हाऊन निघाले. ह्या तीन महिन्यांमध्ये ग्रंथालयात अनेक कार्यक्रम झाले, त्यांपैकी एक महत्त्वाचा म्हणजे ग्रंथालयाचा १३१वा वार्षिकोत्सव. हा तीन दिवसीय उत्सव म्हणजे ग्रंथ आणि ग्रंथालय-प्रेमी ह्यांच्यासाठी एक सांस्कृतिक पर्वणी होती.

२०२१ ते २०२४ ह्या तीन वर्षांसाठी निवडून आलेल्या कार्यकारिणीचा कार्य-काळ पूर्ण होत आहे मात्र, ग्रंथालयाचे उपक्रम हे ग्रंथ-प्रेमींसाठी, रसिकांसाठी अव्याहत चालूच राहतील. 'मग्रंसंठाणे' हे त्रैमासिक हा त्यातलाच एक महत्त्वाचा भाग आहे. डिजिटल त्रैमासिकाच्या माध्यमातून आपल्याशी संवाद साधताना आम्ही पुस्तकांविषयी आणि पुस्तक-कार्यक्रमांविषयी आत्मीयतेने सांगत, लिहीत आहोत हा विरोधाभास नव्हे, तर ती काळाची गरज आहे. साहित्य आणि इतर कला ह्यांच्याशी आपल्याला जोडणारे एक महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र म्हणजे ग्रंथालय. वाढत्या शहराच्या गरजेनुसार आणि मागणीनुसार नव्या तंत्राचा स्वीकार करणारे हे ग्रंथालय नव्या पिढीपर्यंत साहित्याचा, कलेचा प्रवाह पोहोचवण्यासाठी कटिबद्ध झाले आहे.

'मग्रंसंठाणे' ह्या डिजिटल त्रैमासिकाच्या ह्या अंकाविषयी वाचकांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.

धन्यवाद!

## शारदा मंदिर (डिजिटल लॅब)



## १ जून वर्धापन दिन व रेगे पुरस्कार वितरण

***'लेखकाने सत्तेच्या नव्हे तर सत्याच्याच बाजूने उभे राहावे.'*** **– लेखक श्री कृष्णात खोत**

'लेखक आणि कवींनी कुठल्याही काळात सत्तेच्या नव्हे तर सत्याच्या बाजूने असले पाहिजे' असा विचार साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त **लेखक श्री कृष्णात खोत** यांनी **मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे या संस्थेच्या १३१व्या वर्धापन दिनानिमित्त** आयोजित कार्यक्रमात व्यक्त केला. ते पुढे म्हणाले, 'सध्याच्या दुर्दैवी काळात संवेदनशील हातांनी सतत लिहिते राहिले पाहिजे.'



वर्धापन दिनानिमित्त **वा.अ. रेगे पुरस्काराचे वितरण** त्यांच्या हस्ते करण्यात आले.

ललित गटात **वैभव साटम** लिखित '**भावकी अन गावकी**' या पुस्तकाला तर, ललितेतर गटात **रुपाली मोकाशी** लिखित '**श्रीस्थानकाचे शिलेदार**' या पुस्तकाला **वा.अ. रेगे पुरस्काराने** गौरविण्यात आले.

आपल्या भाषणात श्री कृष्णात खोत पुढे म्हणाले, 'आज आपण जे अन्न खातो, त्यातून आपल्या शरीरात कोणते जिवाणू शिरत आहेत, ह्याबद्दल आपण अनभिज्ञ आहोत. आज युद्ध करण्याकरता इतर शस्त्र हवीतच हे गरजेचं नाही. जैविक युद्ध जास्त सोपं आणि अधिक भयंकर आहे. सत्ता हेच एकमेव सत्य ठरू लागलं आहे. सर्वसामान्य माणूस हतबल झाला आहे. लेखकानं अशा हतबल समाजाच्या मागे उभं राहून, सजगपणे सगळ्या भोवतालाचं निरीक्षण करावं आणि ते लेखणीतून उतरवावं. समाजाला आपल्या लेखनानं बळ द्यावं.'

रेगे पुरस्काराचे हे २५ वे वर्ष आहे. संस्थेचे **अध्यक्ष श्री. विद्याधर ठाणेकर** यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची, डिजिटल कामाची व इ लायब्ररीची माहिती दिली.

# नासाला भेट

✍ दा. कृ. सोमण
पंचांगकर्ते, खगोल अभ्यासक

ह्यूस्टनला नासामध्ये दर शनिवारी सकाळी 'अवकाशवीराबरोबर नाश्ता' हा कार्यक्रम असतो. या कार्यक्रमासाठी अगोदर फी भरून नावनोंदणी करायची असते. या कार्यक्रमात आपणांस एका अवकाशवीराबरोबर नाश्ता मिळतो, यावेळी अवकाशवीराला प्रश्न विचारता येतात. सुमारे दीड तास हा कार्यक्रम असतो. आम्ही या कार्यक्रमासाठी अगोदर नावनोंदणी केली होती. शनिवार ६ एप्रिल रोजी मिस्टर केनेथ डी. कॅमेरामन हे अवकाशवीर भेटणार होते. केनेथ डी.कॅमेरॉन यांनी एकूण २३ दिवस १० तास ११ मिनिटे अंतराळात राहून संशोधन कार्यात सहभाग घेतला होता. त्यांना भेटायची, त्यांच्याबरोबर नाश्ता घेण्याची, त्यांना प्रश्न विचारण्याची संधी आम्हास मिळणार होती.

शनिवार ६ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजताच नासा स्पेस सेंटरच्या सभागृहात आम्ही दाखल झालो. प्रवेशद्वारापाशीच अवकाशवीर केनेथ डी. कॅमेरॉन यांच्या हस्ताक्षरात त्यांच्या फोटोवर आमचे नांव लिहिलेले आणि त्यांची सही असलेले कार्ड आम्हाला देण्यात आले. तसेच नाश्त्याचे पदार्थ डिशमध्ये घेऊन कार्डावर लिहिलेल्या नंबरच्या टेबलापाशी आम्हाला बसायचे होते. आम्ही अगोदर नाव नोंदणी केल्यामुळे आमचे टेबल अवकाशवीर केनेथ यांच्या टेबलाजवळच होते. जवळ जवळ शंभर खगोलप्रेमी जमले होते. नाश्ता खात खात प्रश्न विचारायचे होते. प्रथम एका महिलेने अवकाशवीर केनेथ डी. कॅमेरॉन यांचा परिचय करून दिला. प्रश्नोत्तराचा कार्यक्रम सुरू झाला. प्रश्नकर्त्याने हात वर करायचा, अंतराळवीर केनेथ ज्याला खुणावतील त्याने प्रश्न विचारायचा. ७४ वर्षांचे केनेथ सविस्तर प्रश्नाना उत्तरे देत होते.

मी प्रश्न विचारला -'' मी भारतातून आलो आहे. भारत देश आता चार अंतराळवीरांना आणि एक रोबोट महिला - व्योममित्रा यांना अंतराळात पाठवून पृथ्वीवर सुखरूप आणणार आहे. चंद्राच्या दक्षिण ध्रुव प्रदेशात यान उतरविण्यात भारताला यश मिळाले आहे. भारताच्या अंतराळ क्षेत्रातील या प्रगतीबद्दल तुम्हाला काय वाटते ?''

अंतराळवीर केनेथ डी. कॅमेरॉन म्हणाले -'' भारताची अंतराळ संशोधन क्षेत्रातील प्रगती पाहून मला आनंद होतो. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आय एस्‌ आर्‌ ओ ( इस्रो ) ही संस्था या सर्व मोहिमा कमीत कमी खर्चात करीत असते. परंतू अंतराळ संशोधन क्षेत्रात सर्व देशानी एकमेकांचे सहकार्य घ्यायला पाहिजे. या संशोधनात स्पर्धा असता कामा नये. पृथ्वीवरचे महासागर आणि अवकाश हे सर्वांचे आहे.''

इतरही खगोलप्रेमी प्रश्न विचारीत होते. लहान मुलांच्या प्रश्नानाही अंतराळवीर केनेथ सविस्तर उत्तरे देत होते. खाजगी अंतराळ संशोधन



संस्थाही कार्य करीत आहेत, पण सर्वांनी एकमेकांना सहकार्य करायला पाहिजे. अंतराळवीर अंतराळयानात कसे राहतात ?, चंद्रावर वातावरण नाही मग ध्वज फडकताना कसा दिसला ?, शून्य गुरुत्वाकर्षणाचा आरोग्यावर काय परिणाम होतो ?, अंतराळप्रवासात कोणती काळजी घ्यावी लागते ?, अंतराळात निर्माण होणा-या कच-याची समस्या काय आहे ? , अंतराळयानात निर्माण होणा-या कार्बनडॉयाक्साइडचे काय करतात ? , अंतराळात जेवण काय घेतात ?, व्यायाम कसा करतात ?, अंतराळ प्रवासात धोक्याचे प्रसंग कोणते असतात ?, अंतराळात संशोधन नेमके कोणते करतात ? अ स्पेस टुरिझम कसे असेल ?, पुढील शंभर वर्षात अंतराळ संशोधन क्षेत्रात कोणत्या गोष्टी घडतील ? वगैरे अनेक प्रश्नांची अंतराळवीर केनेथ डी. कॅमेरॉन यांनी सविस्तर उत्तरे दिली. कार्यक्रम अतिशय उत्तम झाला. सर्वांना आनंद झाला.

या कार्यक्रमानंतर आम्ही म्युझियम पाहिले. वेगवेगळ्या प्रकल्पांना भेट देण्यासाठी ट्रॅमस्‌ असायच्या. तेथील नियोजन अतिशय उत्तम होते. नासा म्हणजे नेशनल एरोनॉटिक्स ॲन्ड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन ! पूर्वी अंतराळ संशोधन क्षेत्रात अमेरिका आणि सोविएत युनियन यांच्यामध्ये तीव्र स्पर्धा असायची. ह्यूस्टन मधील या म्युझियममध्ये जवळ जवळ ४०० प्रकल्प आहेत. मर्क्युरी-९, जेमिनी-५, अपोलो -१७, ल्यूनर मॉड्यूल पाहतांना वेळ कसा जातो हेच कळत नाही. स्पेस सेंटर थिएटरमध्ये वेगवेगळे शोज्‌ चालू होते. मून रॉकला स्पर्श करून आनंद मिळवता येतो. स्पेस शटल आतून पहाता येते. ज्येष्ठ नागरिकांसाठी लिफ्टची सोय आहे. रॉकेट पार्क पाहून आपण चकित झालो. इंटरनॅशनल स्पेस स्टेशन, स्कायलॅब पाहतांना खूप आनंद झाला. नील आर्मस्ट्रॉन्ग चंद्रावर उतरले त्या वेळचा नियंत्रण कक्ष जसाच्या तसा एका वेगळ्या इमारतीत ' आठवण' म्हणून जपून ठेवण्यात आला आहे. या सर्व गोष्टी पाहण्यासाठी संपूर्ण जगातून रोज हजारो लोक येत असतात, पण कुठेही गडबड नाही, गोंधळ नाही. सर्व मजेत पहात असतात, आनंद घेतअसतात. खगोलविज्ञान समजून घेत असतात. त्यादिवशी आम्ही सकाळी ८ वाजता गेलो आणि सायं. ५ वाजता न थकता आनंदित होऊन बाहेर पडलो.

## काव्य कट्टा २५ वा कार्यक्रम

मराठी कवितेच्या प्रांतात वेगळ्या कवितेच्या आपापल्या पाऊलवाटा तयार करणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील दोन ज्येष्ठ कवींच्या बहारदार मुलाखतीनं

ठाण्याच्या मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे ह्या सं स्थेच्या १ ३ १ व्या वार्षिकोत्सवाचा प्रारंभ आणि महाराष्ट्र भूषण मंगेश पाडगांवकर काव्य कट्ट्याचा रौप्यमहोत्सवी कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या आरंभी संस्थेचे अध्यक्ष श्री. विद्याधर ठाणेकर ह्यांनी प्रास्ताविक मांडले. संस्थेच्या विश्वस्त श्रीमती वासंती वर्तक, उपाध्यक्ष श्री. हेमंत काणे, श्री. पद्माकर शिरवाडकर, कार्याध्यक्ष श्री. विनायक गोखले, कार्यवाह श्री. चांगदेव काळे, श्री. दुर्गेश आकेरकर तसेच इतर पदाधिकारी आणि अनेक मान्यवर ह्यांच्या उपस्थितीत ह्या काव्यमैफलीस सुरुवात झाली.

नाशिक जिल्ह्यातल्या आदरणीय वीर सावरकर, कुसुमाग्रज इत्यादी थोर कवींच्या काव्यानं मराठी कवितेचा प्रांत समृद्ध झाला आहे. कवितेचा असा वारसा पुढे चालवणाऱ्या कवींच्या पिढीतील कवी प्रकाश होळकर आणि कवी संजय चौधरी ह्यांच्याशी ह्या कार्यक्रमाच्या निमित्तानं संवाद साधला लेखिका डॉ. निर्मोही फडके ह्यांनी.

काळ्या मातीशी जुळलेली आपली नाळ जपणारी, लोकसंस्कृती-लोकगीतांशी नातं सांगणारी अशी कवी प्रकाश होळकर ह्यांची कविता आणि गीतं, ह्यांनी मराठी भाषेतल्या




कविताप्रेमींच्या मनावर गारूड घातलेलं आहे. तसंच बदलती समाज व्यवस्था आणि तुटत जाणारे नातेसंबंध ह्यांच्याबद्दल टोकदार भाष्य करणाऱ्या कवी संजय चौधरी ह्यांच्या कवितेनं स्वत:चं स्थान निर्माण केलं आहे. ह्या दोघांच्या कविता-लेखनाच्या प्रेरणा आणि कवितेचं स्वरूप उलगडत गेलं त्यांच्याशी झालेल्या खुमासदार संवादातून.

ह्या मनमोकळ्या, मन भारून टाकणाऱ्या गप्पांना आणि दोघांच्याही अतिशय भावपूर्ण अशा कविता सादरीकरणाला रसिकांनी भरभरून दाद दिली. कवी अशोक बागवे,कवी अरुण म्हात्रे, कवी महेश केळुसकर, कवी सतीश सोलांकुरकर इ. ज्येष्ठ कवी, तसंच नव्या पिढीतील कवी संकेत म्हात्रे, कवी गीतेश शिंदे इ. कवितेच्या प्रांतात मुशाफिरी करणारे आणि कवितेवर प्रेम करणारे कविताप्रेमी ह्यांच्या साक्षीनं ही संध्याकाळ कवितामय होऊन गेली.

## ‘अंतर्नाद: एका मासिकाचा उदयास्त’ पुस्तक प्रकाशन




०५ मे रोजी ग्रंथालयात ‘अंतर्नाद: एका मासिकाचा उदयास्त’ ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ह्या आयोजनात प्रामुख्याने बदलापूरचे ’ग्रंथसखा’ श्याम जोशी ह्यांनी पुढाकार घेतला होता.

अडीच दशके मराठी साहित्याची सेवा करणारे, वाचन-प्रेमींच्या पसंतीचे असे हे अंतर्नाद. अंतर्नाद ह्या मासिकाने वाचकांना उत्तम आणि सकस लेखन वाचण्याची सवय लावली होती. आर्थिक व्यवहारांच्या आणि तंत्रांच्या भडिमाऱ्यापुढे कसेतरी टिकून राहण्याचा प्रयत्न करणारी अनेक मराठी मासिके काळाच्या ओघात बंद पडत गेली. अंतर्नाद त्यापैकी एक. ह्या मासिकाचे संपादक श्री. भानू काळे ह्यांनी अंतर्नादचा प्रवास रेखाटणारे ‘अंतर्नाद: एका मासिकाचा उदयास्त’ हे पुस्तक वाचकांसमोर आणले आहे. ग्रंथालयातील कार्यक्रमात ह्या पुस्तकाविषयी ज्येष्ठ संपादक, लेखक श्री. दिनकर गांगल, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. मीना वैशंपायन आणि ज्येष्ठ संपादक, विचारवंत श्री. श्रीराम शिधये ह्यांनी अभ्यासपूर्ण भाष्ये केली. अंतर्नादसारखी मासिके टिकवण्यासाठी वाचक आणि ग्रंथालये ह्यांनी काय करावयास हवे, ह्या विषयाबद्दल अंतर्नादच्या निमित्ताने विचारमंथन सुरू झाले आहे, हेही नसे थोडके.



# मराठी ग्रंथ संग्रहालयाचे कार्याध्यक्ष विनायक गोखले यांना राज्य शासनाचा 'ग्रंथ मित्र' पुरस्कार जाहीर!

✍ **चांगदेव काळे** -कार्यवाह



डॉक्टर एस आर रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता ग्रंथ मित्र पुरस्कार राज्य शासनाच्या वतीने दरवर्षी ग्रंथालय कार्यकर्ते आणि सेवक यांना ग्रंथ मित्र या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यासाठी रोख रक्कम, सन्मानचिन्ह,. प्रमाणपत्र आणि पुस्तक भेट असे या पुरस्काराचे स्वरूप असते. यावर्षी हे पुरस्कार दिनांक पाच ऑगस्ट २०२४ रोजी जाहीर झालेले आहेत. यात ठाण्यातील विनायक दत्तात्रय गोखले यांना राज्यस्तरावरील 'डॉक्टर एस आर रंगनाथन ग्रंथालय उत्कृष्ट कार्यकर्ता (ग्रंथमित्र)' हा रुपये ५० हजाराचा पुरस्कार जाहीर झाला आहे. तो लवकरच शासनाच्या वतीने समारंभपूर्वक प्रदान करण्यात येईल. राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्कार मिळविणारे विनायक गोखले हे ठाणे जिल्ह्यातील पहिलेच कार्यकर्ते आहेत.

विनायक गोखले यांचा मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे या संस्थेची कार्यकर्ता म्हणून जोडला गेलेला स्नेह हा सन १९ ७० पासूनचा. संस्थेशी एक वाचक म्हणून असलेले नाते त्यांनी कार्यकर्ता या नात्यात रूपांतरीत केले. आणि तेव्हापासून आजतागायत त्यांचे हे नाते अधिकाधिक दृढ होत गेलेले दिसून येते. सुरुवातीला कार्यकारणी सभासद म्हणून त्यांनी आपली कार्यकर्ता कारकीर्द सुरू केली. ती गेली ५० हून अधिक काळ अव्यहातपणे सुरू आहे. आज मितीस ते संस्थेचे कार्यकारिणीचे कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. या काळात केवळ संस्थेचा कार्यकर्ता म्हणून काम पाहिले असे नाही, तर संस्थेमध्ये विविध पातळीवर करावयाचे बदल, ग्रंथालयात येणाऱ्या ग्रंथांची निवड, सेवकांची आणि वाचकांशी ठेवावयाचा समन्वय, आणि वाचन संस्कृती अधिक वृद्धिंगत करण्यासाठी करावयाचे सातत्यपूर्ण प्रयत्न, यामुळे विनायक गोखले एक उत्तम कार्यकर्ता म्हणून नावारुपास आले. त्यांच्या या दीर्घ कालखंडात संस्थेने अनेक बदल पाहिले तसेच संस्थेने अनेक उपक्रम हाती घेतलेले आहेत. वा. अ. रेगे साहित्य पुरस्कार परीक्षक म्हणून त्यांनी काम पाहिलेले आहे. विविध साहित्यिक उपक्रमासोबतच ठाणे येथे आयोजित केलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनात त्यांचा मोठा सहभाग होता.

मराठी ग्रंथ संग्रहालयाने अलीकडच्या काळात विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, संगणकीय अभ्यासिका, संगणकाधारित पुस्तकांची देवघेव व ग्रंथालयीन व्यवहार, वेबसाईट अशी डिजिटल स्वरूपात खूप मोठी झेप घेतली आहे. ठाणे शहराचा वाढता पसारा पाहता दूर गेलेल्या वाचकांना पुस्तकांपासून दूर राहण्याची वेळ येऊ नये म्हणून फिरते वाचनालय (ग्रंथयान) सुरू केले आहे. या सगळ्यात विनायक गोखले यांचा सहभाग खचितच प्रशंसनीय म्हणावा असा आहे. संस्थेला देणगी आणि वस्तूस्वरूपाची मदत मिळविण्याच्या प्रयत्नात त्यांचा सहभाग नेहमीच मोठा राहिलेला आहे. वाचकांना अधिकाधिक उत्तम सेवा कशी देता येईल याचाच ते सातत्याने विचार करीत असतात व त्या दिशेने प्रयत्न करीत असतात. त्यामुळेच कार्यकर्ता कसा असावा आणि त्याने कार्य करीत असताना किती विविध अवधाने पाळावी लागतात, त्या त्या क्षेत्रामध्ये जाऊन आपला ठसा कसा उमटावा लागतो, हे गोखले यांच्या कर्तृत्वाने सिद्ध केले आहे.

हीच बाब जिल्हा ग्रंथालय संघाच्या बाबतीत सांगता येईल. ठाणे जिल्हा ग्रंथालय संघाच्या कार्यकारणीचा साधा सभासद, खजिनदार, कार्यवाह ते अध्यक्षपद अशा विविध पातळीवर त्यांनी काम पाहिलेले आहे. ग्रंथालय संघाच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा वर्गाचा वर्गव्यवस्थापक म्हणून काम पाहिले. तसेच हा अभ्यासक्रम आपणही आत्मसात करावा या उद्देशाने स्वत: त्या वर्गात प्रवेश घेऊन उत्तम गुणांनी ते उत्तीर्ण झाले. नंतर काही काळ याच वर्गात मुख्याध्यापक प्रा मोहन फाटक यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शिक्षक म्हणून काम पाहिलेले आहे. जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने वार्तापत्र प्रकाशित करण्यात येत असे, तेव्हा त्याची संपादकाची जबाबदारी त्यांनी सांभाळलेली आहे. ग्रंथालय चळवळीविषयी आस्था असल्यानेच ग्रंथालये आणि ग्रंथालय कार्यकर्ते यांना शिबिरे, कार्यशाळा, व्याख्यानमाला याद्वारे मार्गदर्शन करण्याची व प्राप्त करून देण्याची तळमळ त्यांनी दाखविलेली आहे. यासाठी वेळोवेळी वृत्तपत्रात लेखन देखील केलेले आहे. विभाग ग्रंथालय संघ, राज्य ग्रंथालय संघ यांनी वेळोवेळी आयोजित केलेली अधिवेशने, शिबिरे, कार्यशाळा यांना उपस्थित राहण्याचा कटाक्ष त्यांनी कायम पाळला.

कोकण विभाग ग्रंथालय संघा कार्यालय, ठाणे जिल्ह्याकडे होते. तेव्हा या विभागावर कार्यवाह ते कार्याध्यक्ष पदापर्यंत त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवलेला आहे.

राज्य ग्रंथनिवड समितीवर ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्त्याची निवड करण्यात येते. या समितीवर विनायक गोखले यांनी कोकण विभागाचे प्रतिनिधित्व केलेले आहे. ग्रंथ निर्मिती आणि ग्रंथालय व्यवहार याबाबत देखील त्यांची जाण उत्तम आहे. त्यांच्या या गुणांमुळेच ग्रंथाली वाचक चळवळ, साहित्य यात्रा, व्यास क्रिएशन या संस्थांशी त्यांचे घनिष्ठ संबंध राहिलेले आहेत. अनेक पुस्तक प्रदर्शनांच्या आयोजनामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. इतकेच नव्हे तर आपला अधिकाधिक वेळ ते अशा पुस्तक प्रदर्शनासाठी

पान नं ६ वर

# आधुनिक उपकरणांनी सुसज्ज डिजिटल ग्रंथालय !!

✍ डॉ. संदीप भावसार

मराठी ग्रंथ संग्रहालय ही संस्था १ जुन, १८९३ रोजी ठाण्यात स्थापन झाली. १३० पेक्षा जास्त वर्षांपासून वाचकांच्या सेवेत असणाऱ्या या संस्थेचा प्रवास ही सर्वसमावेशक असा आहे. शतकोत्तर परंपरा लाभलेल्या या संस्थेचे, मराठी ग्रंथांचे, भाषेचे संवर्धन व जतन करणे हे प्रमुख उद्दिष्ट व ध्येय साध्य करताना शिस्तीने संस्थेचा कारभार चालवत योग्य ती बचत करून त्यातून विद्यार्थीवर्गासाठी माफक दरात स्वस्त अभ्यासिका सुरू करणे, वाचक वर्गाच्या सोईसाठी संपूर्ण ठाणे शहरात विभागवार फिरणारे ग्रंथयान सेवा देणे तसेच नुकताच स्पर्धा परीक्षा देणाऱ्या इच्छुकांसाठी सर्व आधुनिक उपकरणांनी सुसज्ज अशी डिजिटल लायब्ररी सुरू करणे ई. उपक्रम संस्था अतिशय दिमाखाने राबवित आहे. आगामी काळात वाचकांना घरपोच सेवा देण्याचा मानस ही संस्था आखत आहे. ही नवनवीन शिखरे पादाक्रांत करत असताना आपल्या जुन्या ग्रंथसंपदेचे जतन ही संस्था अतिशय जबाबदारीने करत आहे. २०२४ मध्ये संस्थेकडे एक लाख ऐंशीहजारा पेक्षा जास्त पुस्तके असून अत्यंत दुर्मिळ पुस्तकांचे स्कॅन करून डिजिटल स्वरूपात त्यांचे डी स्पेस हि आधुनिक प्रणाली वापरून जतन करण्याचे काम संस्था गांभीर्याने करत आहे. स्थापनेपासूनच अतिशय निस्वार्थी आणि सचोटीच्या भावनेने काम करणारे कार्यकारी मंडळ संस्थेला वेळोवेळी लाभल्याने संस्थेचे आजचे अस्तित्व हे भक्कम स्थितीत आहे ही गोष्ट आवर्जून नमूद करावीशी वाटते.

**ग्रंथालयातील सेवांबाबत तपशीलवार माहिती :**

**१) डिजिटल अभ्यासिका :** ग्रंथालयाच्या दोन्ही शाखांमध्ये डिजिटल अभ्यासिका सुरू केली आहे.

महाराष्ट्र सरकारने २० लाख रुपये अनुदान देऊन मराठी ग्रंथ संग्रहालयात डिजिटलअभ्यसिका हा महत्त्वकांशी प्रकल्प उभारला आहे. या प्रकल्पा अंतर्गत शासनाने १० संगणक, १ प्रिंटर, १ प्रोजेक्टर, १ मोठी स्क्रीन, फर्निचर मध्ये टेबल खुर्च्या, संगणकाला लागणारा बॅटरी बॅकअप आणि आणि इंटरनेट सुविधा तसेच CCTV कॅमेरा दिलेला आहे. मराठी ग्रंथ संग्रहालयाने वाचकांची भविष्यातील गरज ओळखून ग्रंथालयाच्या दोन्ही शाखेमध्ये या प्रकल्पासाठी जागा दिली आहे

याठिकाणी खालील सेवा उपलब्ध आहेत :

- स्पर्धा परीक्षेसाठी लागणारी ई-पुस्तके - १०००
- ६० भाषांमध्ये ई-वर्तमानपत्रे - magzter Database
- ६० भाषांमध्ये ई-मासिके - magzter Database
- ६० भाषांमध्ये ई-जर्नल्स

तसेच तिथे नविन आलेली स्पर्धा परीक्षेची इ पुस्तके, देश विदेशातील इ -वर्तमान पत्रे यांची माहिती आणि इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या मोफत ई-संसाधनांच्या प्रकल्पांवर माहितीपर व्याख्यान ग्रंथालयाच्या नौपाडा शाखा येथे दर शनिवारी आयोजित करण्यात येतात.

ग्रंथालयाने असे व्याख्यान अधिकाधिक विषयांवर घेण्याचे ठरवले असून तरुण वाचकांना वाचनाकडे आकर्षित करेल असे वाचन साहित्य देण्याचे प्रयत्न केले आहे.

*KOHA Software द्वारे वापरकर्ते आता त्यांच्या मोबाईलवरूनही ग्रंथालयीन संग्रह पाहू शकतात.

तसेच पुस्तकाबद्दल चा स्वत:चा अभिप्राय ही नोंदवू शकतात.(Opac.granthyan.com)

*ग्रंथालयाच्या सर्व नवीनतम updates आणि मोफत ई-संसाधनांच्या लिंक्ससाठी, तसेच १२००० डिजिटाइज्ड पुस्तकांच्या वाचनासाठी ग्रंथालयाने खालील संकेतस्थळ तयार केले आहे. www.granthyan.com

*डिजिटल लायब्ररी मध्ये

"३D printer" ही उपलब्ध आहे, या तंत्रज्ञानाने विद्यार्थी,व्यावसायिक यांना सर्जनशीलता, नवीनता तसेच नवकल्पनांना व्यासपीठ मिळेल. ज्याच्या वापराबद्दल वेळोवेळी व्याख्याने घेतली जातील.

**२) देवघेव विभाग :**

ग्रंथालयाच्या दोन्ही शाखेमध्ये देवघेव विभाग आहे जिथे मोठ्या प्रमाणावर वाचकांची देवघेव चालू असते. आणि आता यावर्षीपासून वाचकांची ही देवघेव अधिकच सुलभ आणि कमी वेळेत व्हावी यासाठी ग्रंथालयाने "RFID" नावाचे मशीन आणले आहे. RFID म्हणजे रेडिओ फ्रिक्वेंसी आयडेंटीफिकेशन हे एक वायरलेस कम्युनिकेशन तंत्रज्ञान आहे. याला वाचकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, आता पुस्तकांच्या नोंदी करण्यासाठी वाचकांना रांगा लावण्याची गरज भासणार नाही. विशेष म्हणजे, हे तंत्रज्ञान सार्वजनिक वाचनालयात सुरू करणारे मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे हे महाराष्ट्रातले पहिले ग्रंथालय आहे.




**३)संदर्भ विभाग :** ग्रंथालयात सुसज्य असा संदर्भ विभाग आहे ज्याठिकाणी वाचकांना हवी ती माहिती अगदी कमी कालावधीमध्ये मिळते, आणि यामुळेच वाचकांचा ग्रंथालयावर असणार विश्वास




अधिकच दृढ बनला आहे. व्हाट्सअँप ग्रुपवर देखील वाचकांच्या संदर्भ प्रश्नांचे उत्तर तात्काळ दिले जातात.

**४) ग्रंथयान सेवा :**

गेल्या काही वर्षात ठाणे शहर झपाट्याने विस्तारित होत आहे. शहराच्या या विस्तारीत भागात राहणाऱ्या या वाचन प्रेमींसाठी ग्रंथयान या फिरत्या वाचनालयाची योजना आपण केली त्याला ५ वर्षे पूर्ण झाली आहेत. ग्रंथयानला वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभत आहे. सध्या ग्रंथयान ३३ ठिकाणी सेवा देत आहे.

**५)लहान मुलांसाठी बालकुमार ज्ञानकोपरा :** उन्हाळी सुट्टीनिमित्त लहान मुलांसाठी हा उपक्रम चालू करण्यात आला आहे.यामधे लहान मुलांसाठी मोफत बालसाहित्य वाचनाची सोय करण्यात आली आहे.तसेच कींडल चा ही वापर याठिकाणी केला जातो.

महाराष्ट्र शासनाची ग्रंथालयाकडून असलेली अपेक्षा मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे पूर्ण करेल आणि भविष्यात वाचकांना अशीच सेवा देऊन त्यांचे समाधान करत राहिल. आजच्या या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात ही आपली वाचन संस्कृती अभिमानाने जोपासण्याचे काम संस्था प्रमाणिकपणे करत आहे. माफक दरात वाचकांना सोयीसुविधा आणि सेवा पुरविण्याचा घेतलेला हा वसा संस्थेचे पदाधिकारी अतिशय नेटाने पेलत आहेत. संस्थेच्या विद्यमान सभासदांनी ही आपल्या भावी पिढीला वाचन संस्कृतीकडे वळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि आपल्या मराठी संस्कृतीचा हा अनमोल ठेवा जपण्याची जबाबदारी थोडी थोडी पेलेली पाहिजे. समाजात संस्कृती टिकविण्याच्या भावनेन काम करणाऱ्या अशा सेवाभावी संस्थांना कायम लोकांकडून आशीर्वाद आणि प्रेम मिळत राहो हीच अपेक्षा

✍ **डॉ. संदीप भावसार**

पान नं ४ वरुन

देतात. आलेल्या वाचकांना पुस्तकांचा, लेखकाचा परिचय आणि उत्तम काय आहे याची ओळख करून देत हा व्यवहार अधिक अधिक करण्याचा ते प्रयत्न करतात. म्हणूनच अनेक प्रकाशक त्यांचे मित्र आहेत. राजहंस, पॉपुलर मॅजेस्टिक, मनोविकास, संधीकाल, यासारख्या अनेक प्रकाशन संस्था आणि त्यांचे प्रकाशक, साहित्यिक संस्था आणि लेखक यांच्याशी त्यांचे स्नेहल संबंध आहेत. या सगळ्यांचे मूळ कारण विनायक गोखले यांचे पुस्तकांवर असलेले नितांत प्रेम आणि वाचनाची आंतरिक ओढ!

अशा कर्तृत्वाची ५० वर्षे या पुरस्काराने उजळून टाकलेली आहे. सगळ्यांना सोबत घेऊन चालणारा कार्यकर्ता ही त्यांची ओळख आहेच, परंतु त्यांची खरी ओळख आहे ती वाचक म्हणून. वाचनाचा व्यासंग आणि वेड म्हणजे काय, याचे उदाहरण दाखवायचे झाल्यास विनायक गोखले यांचे नाव अग्रभागी येते. कुठलाही लेखक समोर येऊ देत, त्याच्या पुस्तकांची यादी यांच्या ओठावर असते. नुसतीच यादी नाही तर तिच्यातील संदर्भ देखील ते सहजपणे सांगतात. त्यामुळे सर्वच लेखकांशी त्यांचे मैत्रीचे संबंध आहेत. अनेक संस्थांवर देखील ते काम पाहत आहेत. त्यातली एक संस्था आहे कळव्यातील जवाहर वाचनालय. ही संस्था गोपीनाथ पाटील यांच्या नावाने दरवर्षी साहित्य पुरस्कार प्रदान करते. या पुरस्कारांसाठी लेखक अथवा प्रकाशाकांकडून पुस्तके मागविण्यात येत नाहीत. या पुरस्कारात परीक्षक म्हणून त्यांची भूमिका नेहमीच मोलाची ठरलेली आहे.

आता पुरस्कार मिळाला म्हणजे थांबायला हरकत नाही, अशीही त्यांची भूमिका नाही. तर अधिक जोमाने या क्षेत्रात आपले योगदान देण्यासाठी हा पुरस्कार शासनाने मला दिला आहे, त्यामुळे अखेरच्या श्वासापर्यंत ग्रंथालय क्षेत्रात माझे योगदान देत राहणार, असा त्यांचा निर्धार आहे. त्यांचा हा निर्धार आणि कर्तृत्व आपल्या सगळ्यांना नक्कीच प्रेरणा देणारे ठरेल असा विश्वास वाटतो.

पटलं तेच स्वीकारणारा, न पटल्यास त्याचा उच्चार न करता गप्प राहणारा, आपल्याला जे योग्य वाटते तेच करीत राहणारा, असा हा मित्र आहे. आमच्या या प्रिय ग्रंथमित्र पुरस्काराने सन्मानित मित्राचे मन:पूर्वक अभिनंदन!

✍ **चांगदेव काळे** -कार्यवाह

# राज्य ग्रंथ निवड समितीवर श्री चांगदेव काळे ह्यांची निवड

✍ **निर्मोही फडके**

राज्य ग्रंथ निवड समितीवर कोकण विभागातून ज्येष्ठ लेखक, समीक्षक आणि ग्रंथालयाचे कार्यवाह श्री. चांगदेव काळे ह्यांची निवड झाली आहे.

साहित्य क्षेत्रात, तसेच ग्रंथालय चळवळीत क्रियाशील असलेल्या एका सर्जनशील साहित्यिकाची आणि उत्तम व्यक्तीची योग्य पदावर निवड झाल्याबद्दल सर्व ग्रंथप्रेमींना मनापासून आनंद झाला आहे.

श्री. चांगदेव काळे ह्यांची लेखणी ललित लेखनात, तसेच समीक्षात्मक लेखनातही लीलया फिरते. स्वत: उत्तम कथाकार असलेल्या काळे ह्यांनी मराठी साहित्य क्षेत्रात आपल्या चौफेर लेखनाने मोलाचे योगदान दिले आहे. श्री. काळे सर हे कायद्याचे अभ्यासक असून, आत्तापर्यंत त्यांनी अनेक संस्थात्मक पदे भूषवली आहेत. महाराष्ट्रातील, विशेषत: ठाणे शहरातील ग्रंथालय चळवळीचे ते सक्रीय कार्यकर्ते आहेत.

विविध सांस्कृतिक आघाड्यांवर कार्यरत असलेले श्री. चांगदेव काळे हे शहरातील गुंत्यांमध्ये गुंतलेले असतात, पण तितकेच ते आपल्या काळ्या आईच्या सेवेतही गुंग असतात. गावाकडच्या काळ्या मातीत दिवसरात्र खपून सोने पिकवणाऱ्या काळे सरांमध्ये शिवारातला रसरशीतपणा आणि गावाकडचा साधेपणा मुरलेला आहे.



पण त्याचा ते कधीही देखावा करत नाहीत. काही दिवस गावात, तर काही दिवस शहरात हा समतोल ते आनंदाने साधतात. म्हणूनच कदाचित त्यांच्या लेखणीतून अस्सल मातीचा दरवळ, तर संस्थात्मक कामांतून पक्की कॉर्पोरेट शिस्त दिसून येते.

राज्य ग्रंथ निवड समितीवर कोकण विभागातून श्री. चांगदेव काळे ह्यांची झालेली निवड ही ग्रंथालयासाठी, ठाणेकरांसाठी अभिमानाची बाब आहे.

ज्येष्ठ साहित्यिक श्री. चांगदेव काळे ह्यांचे मनापासून अभिनंदन आणि त्यांना हार्दिक शुभेच्छा!




## ‘काव्य कट्टा’

# काव्य कट्ट्यावर कवयित्री निरुपमा उजगरे

ग्रंथालयाच्या रौप्यमहोत्सवी काव्य कट्ट्यानंतरचा सव्वीसावा काव्य कट्टा गाजला तो ज्येष्ठ कवयित्री अनुपमा उजगरे ह्यांच्या उपस्थितीनं. अनुपमाताईंच्या भावस्पर्शी कवितांनी रसिकांच्या मनावर गारूड केलं. ताईंना लाभलेला अनेक दिग्गज कवींचा सहवास, त्यांच्या रम्य आठवणी अशा एकूणच कवितेच्या अलवार जगाबद्दल त्यांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या.

बाहेर बरसणाऱ्या जलधारा आणि सभागृहात मनाला भिजवणाऱ्या काव्यधारा अशी ही मैफल जमली होती.

जवळपास २ तास रंगलेल्या ह्या गप्पा थांबूच नयेत, असंच उपस्थित प्रेक्षकांकडून सांगण्यात आलं.

# मग्रंसंठाणे वार्ता

वर्ष १ ले । अंक - ३ । ऑगस्ट २०२४ २०२४ । पाने -८ संपादक - संजीव फडके, डॉ. निर्मोही फडके





## प्रकट मुलाखत

रविवार दि. २ जून रोजी सुप्रसिद्ध नाट्यदिग्दर्शक आणि NSD चे माजी संचालक मा. श्री. वामन केंद्रे आणि ज्येष्ठ सिने-नाट्यदिग्दर्शक श्री. कुमार सोहोनी यांच्या मुलाखतीचा कम गप्पांचा कार्यक्रम बहारदार झाला. ज्येष्ठ सिने-नाट्य लेखक व दिग्दर्शक श्री महेंद्र तेरेदेसाई यांनी त्यांना बोलते केले.

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

नोंदणी क्र. एफ.४ - ठाणे

(सरकारमान्य 'अ' वर्ग ठाणे जिल्हा मुक्तद्वार सार्वजनिक वाचनालय)

सरस्वती मंदिर, दुसरा मजला, जिल्हा परिषदेसमोर, नेताजी सुभाष पथ, ठाणे- ४००६०१

### देवघेव विभाग

९७६८२ ५७५७५
२५४०६७८७

२ रा मजला, वेळ - सकाळी ८ ते रात्रौ ८ पर्यंत, साप्ताहिक सुट्टी - सोमवार

### संदर्भ विभाग

८७७९६ ९६७९६

अभ्यासिका, ५वा मजला, वेळ - सकाळी ८ ते रात्रौ ८ पर्यंत, साप्ताहिक सुट्टी - रविवार

### मुक्तद्वार विभाग

तळ मजला, वेळ - सकाळी ९ ते दुपारी १ व सायंकाळी ४ ते रात्रौ ८ पर्यंत

### ग्रंथयान (फिरते वाचनालय)

८६९३८ ०६७२७

वेळ - दुपारी १२ ते रात्रौ ८ पर्यंत, साप्ताहिक सुट्टी - सोमवार

### सभासद प्रकार

१) आश्रयदाते रु. १०,०००/- एक रक्कमी
२) आजीव सभासद रु. ५,०००/- एक रक्कमी
३) अनामत रु. ५००/- प्रत्येकी एक पुस्तकास
४) प्रवेश शुल्क रु. ५०/-
५) पुस्तक शाखा वर्गणी द्विमाही रु. १५०/-
६) मासिक शाखा वर्गणी द्विमाही रु. ५०/-
७) बाल वाङ्मय वर्गणी द्विमाही रु. २०/-

## सरस्वती मंदिर (अभ्यासिका)



## शारदा मंदिर (नौपाडा शाखा)



**मुख्य शाखा** सरस्वती मंदिर, जिल्हा परिषदेसमोर, नेताजी सुभाष पथ, ठाणे- ४००६०१

**नौपाडा शाखा** शारदा मंदिर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे- ४००६०१

सरस्वती मंदिर (मुख्य कार्यालय) - भ्रमणध्वनी :९७६८२ ५७५७५
शारदा मंदिर (नौपाडा केंद्र) -भ्रमणध्वनी : ९३२६६ ६७४७०
संदर्भ - भ्रमणध्वनी : ८७७९६ ९६७९६ ग्रंथयान - भ्रमणध्वनी : ८६९३८ ०६७२७